# गठीत करण्यात आलेल्या समितिच्या बैठकिचा इतिवृत्तांत

**विषय:-** न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारसी करण्या साठी गठीत समितीची दिनांक ३०/११/२०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकिचा इतिवृत्तांत

**संदर्भ** :- शासन परिपत्रक क्रमांक डीपीपी-२०१५/प्र.क्र.५१/पोल-१०, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ अन्वये

------- ० ० ० -------

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन अपर पोलीस अधीक्षक यांचे दालनात दिनांक ३०/११/२०१७ रोजी न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारसी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे अध्यक्ष श्री. प्रशांत कदम, अपर पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामीण, सदस्य श्रीमती व्ही. एस. जाधव, सहा. सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, ठाणे तसेच पोलीस निरीक्षक श्री. व्हि. आर. आंधळे, स्थानिक गुन्हे शाखा हे हजर होते. सदर बैठकितील चर्चेत श्रीमती ज्योत्स्ना काळण, विधी अधिकारी गट- ब, ठाणे ग्रामीण यांनाही बोलाविण्यात आले होते.

१) सर्वप्रथम २०१७ मधील सुटलेल्या केसेसवर चर्चा करण्यात आली. तपासी अंमलदार यांच्या चुकिमुळे/हलगर्जीपणामुळे काही केसेस सुटल्यात काय याचा प्राप्त निकालाच्या प्रतीवरुन अभ्यास करण्यात आला.

२) बैठकिदरम्यान माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१७ या कालावधीत निकाली निघालेल्या केसेसचा आढावा घेण्यात आला. सुटलेल्या एकुण २७ केसेसच्या निकालाच्या प्रतींचा अभ्यास केला असता प्रकर्शाने जाणवलेल्या केसेस म्हणजे १)

शहापुर पोस्टे I २२२/११ भादवि २९५, ४३५ अजाज २) नवघर पोस्टे I ३५/१० एनडीपीएस २०, २२ ३) किन्हवली पोस्टे ७/१२ भादवि ३०२, २०१ ४) गणेशपुरी पोस्टे I ७१/१५ भादवि ३०२, ३४ ५) मुरबाड पोस्टे I ९४/०१ भादवि ३०७ ६) कसारा पोस्टे I ४५/१५ भादवि ३०२, २०१ हया सहा केसेस आहेत. परंतु केसेसचा सखोल अभ्यास केला असता चर्चेदरम्यान तपासी अधिकारी यांच्या चुकीमुळे, हलगर्जिपणामुळे निर्दोष मुक्त झालेल्या एकुण ४ केसेस निदर्शनास आल्या आहेत. शहापुर पोस्टे I २२२/११ भादवि २९५, ४३५ अजाज व कसारा पोस्टे I ४५/१५ भादवि ३०२, २०१ हया दोनही केसेसचा सखोल अभ्यास केला असता यात तपासीक अंमलदार यांची चुकी आढळुन आली नाही. उर्वरीत चारही केसेसच्या तपासीक अंमलदार यांचेवर कसुरी अहवाल पाठविण्यात आले आहेत.

३) तसेच बैठकिदरम्यान दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याकरिता आणखी काय काय उपाययोजना राबविता येतील यावर चर्चा करण्यात आली.

**सदस्य**

(व्हि.आर.आधळे)
पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा,
ठाणे ग्रामीण

**सदस्य**

(व्हि.एस.जाधव)
सहा.सरकारी वकील व
अतिरिक्त सरकारी अभियोक्ता
ठाणे

**अध्यक्ष**

(प्रशांत कदम)
अपर पोलीस अधीक्षक,
ठाणे ग्रामीण